# ऋण

'आनंदी' बंगला रोषणाईने सजला होता. कोपऱ्याकडूनच बंगल्याचे मनमोहक लायटिंग दिसत होता. बंगल्यातून मंजूळ व सुरेल सनईचे स्वर निनादत होते. आंब्यांचे तोरण, फुलांच्या माळा हवेत झुलत होत्या. आजचा हा सुदिन बंगल्यातील माणसांसाठी फार महत्वाचा होता. आज आनंदी- विनायकरावांच्या लग्नाचा ५०वा वाढदिवस सुदेश – अनुष्काने दणक्यात साजरा करण्याचे ठरवले होते. सारे नाते - वाईक, आमंत्रित व पाहुणे मोठ्या उत्साहाने बंगल्यात दाखल झाले होते. संध्याकाळची धुंद वेळ, सुखद शीतल गारवा व सनईचे सुश्राव्य स्वर ह्या साऱ्यांनी वातावरणात आनंदाचा तरंग उठला होता. एक उत्स्फूर्त उत्साह व सुगंध, समाधान यांनी आनंदी बंगला झळाळून गेला होता. बंगल्याची आनंदी अक्षरे लखलखत होती व आसमंतात उठून दिसत होती. सुदेश- अनुष्का आलेल्या प्रत्येकाशी आपुलकीने व प्रेमाने चौकशी करत होते. विनायकरावांचे मित्र व आनंदीच्या मैत्रिणींची जातीने व्यवस्था बघत होते. संध्याकाळचा सुंदर माहोल त्यात फुलांच्या माळांनी व लाइटने सजवलेला बंगला नुसता आकाशातल्या चांदण्या पूर्णिमा - सारखा चमकत होता.

सुदेश व स्वानंदी ह्या दोन गुणी मुलांचे आईबाबा आनंदी–विनायक. घरचे उत्पन्न बेतास बातच होते पण घरात सुख व आनंद भरभरून वाहत होता. पण अचानक दृष्ट लागली. स्वानंदी शाळेतून घरी येतांना तिला ट्रकने उडवले व औषध उपचारांच्या आधीच परमेश्वराने तिला आपल्या मिठीत घेतले. ह्या धक्काने आनंदीने विश्वच विसरले. विनायकराव अबोल झाले तर आनंदी जगणेच विसरून गेली. तिला परत पूर्वस्थितीत आणण्यासाठी विनायकराव, सुदेश व मित्र मैत्रिणींना फार त्रास घ्यावे लागले. तिची ती शून्यात हरवलेली नजर, निर्जीवपणे हरवलेले जगणे सारे सारे २-३ वर्षे चालूच राहिले. पण हळूहळू काळ हेच औषध म्हणतात तसे सुदेशला बघून तिने सावरण्याचा

(2)

प्रयत्न केला. सुदेश बाबतीत ती फारच हळवी व कोमल झाली. सुदेश मुळातच हुषार, समंजस व गुणी होता. परिस्थितीचे गांभिर्य समजून व त्यावर नेटाने मात करत, स्कॉलरशिप मिळवत तो यशाच्या एकेक पायऱ्या चढत गेला. आनंदीने प्रसंगी दागिने तर काय मंगळसूत्रही मोडून सुदेशचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण संपताच हुषारीमुळे सुदेशाला चांगली नोकरी लागली. सरस्वती होतीच आता लक्ष्मीचीही वास तेथे होऊ लागला.

पहिल्याच पगारात सुदेशने मंगळसूत्र भेट दिले व ४-६ वर्षात सारे परत दागिने करण्याचे आश्वासन दिले. साश्रू नयनांनी आनंदी व विनायक रावांनी सुदेशला मिठीत घेतले. दिवसोंदिवस सुदेश त्याच्या कर्तबगारीवर, हुषारीने व लाघवी सुसंस्कारीत वागण्याने ऑफिसमधे वरच्या पोस्ट वर गेला. सार्यांचाच तो आवडता होता. त्याच्या कष्टाळू, दिलदार वागण्याने व बुध्दिमत्तेच्या सौंदर्यावर साहेब खूष होते. त्यांनी त्यांची भरारी घेण्याची वृत्ती व झेप ओळखली. आपल्या एकुलत्या एक कन्येचा हात त्यांनी सुदेशच्या हातात देण्याचे ठरवले. सुदेशने अनुष्काला सांगितले... मी एकटाच आहे. पण आईच्या डोळ्यातील बाहुली आहे. आनंदीला गमावल्यावर तिचा तो आक्रोश, व उध्वस्त झालेला चेहरा, मरणप्राय यातना भोगत ३ वर्षे तिचे जगणे मी कधीच विसरणार नाही. मी तिचा बहिश्चर प्राण आहे. मला तिला व बाबांना कायम मनापासून जपायचे आहे व बायको म्हणून तुलाही पण तुला साथ घेताना त्यांनाही साथ द्यावयाची आहे. तुला काही त्याग करूनही फार मोठे बक्षीस मिळेल. ~~ठरवल्या~~ ~~ते~~ आपले ४ जणांचे विश्व करून आनंदात कायम एकत्र राहू एवढेच वचन मागतो. व ते मनापासून निभाव. मी जर वेगळा राहिलो तर त्यांची दुनियाच उजाड बनेल व संपेलही. बाकी तुला मी तुझ्या आईवडिलांकरिता तेव्हीच मोकळीक देईन.

अनुष्का मनापासून सुदेशवर खुष होतीच व तिने त्याला

(३)

आईवडिलांबरोबर कायमच राहीन व काळजी घेईन सांगितले. लग्न झाले आनंदीची सून - अनुष्का मुलगीच झाली व घर सुखावले. यथावकाश सुदेशला बढत्या मिळाल्या. बंगला 'आनंदी' बांधला. हेचे द झाले. बंगला, गाडी सारे वैभव मिळाले. आज आनंदीच्या लग्नाच्या ५० वा वाढदिवस साजरा करताना हा सारा जीवनपट तिच्या डोळ्यासमोर आला. घर आनंदाने डोलत होते.
आनंदी - विनायकचे लग्नापासूनचे फोटो हॉलमध्ये लावले होते. मधोमध आनंदी - विनायकचा हसरा फोटो मनवेधून घेत होता. आनंदी ४ ठळक दागिने घालून व पाचू रंगाची कडियल पैठणी नेसून, खोप्याच्या पोनीवर गजरा माळून व डोळ्यात आनंद सांडणारे हसू घेऊन सजली होती. विनायकरावही नवीन सूटात देखणे दिसत होते. कार्यक्रमाच्या वेळी गुलाबांच्या पाकळ्यांच्या पायघड्यावरून अनुष्काने आनंदीला व सुदेशने विनायकरावांना कौतुकाने आणले. सुशोभित केलेल्या शानदार खुर्चीवर बसवले. अनुष्काने प्रेमाने औक्षण केले व दोघांना पेढा भरवला. खानदानी मोरपिशी गढवाल साडीव हिऱ्याचे मंगळसूत्र देऊन ओटी भरली. सुदेशने विनायकरावांना युरोपची ट्रीप बुक केलेले पाकीट दिले व प्रेमाने आई वडिलांना जवळ घेतले. पाहुण्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.
सार्यांनीच आनंदी - विनायक रावांच्या आठवणी सांगत कार्यक्रम रंगवला. शेवटी सुदेश म्हणाला - मला ज्यांनी मनापासून स्विकारले व माझ्या अस्तित्वाला सुबक सुंदर आकार दिला व माझा आनंद आपला मानला त्या मातापित्यांना माझ्या वैभवाचे सारे श्रेय आहे. आणि माझी सखी, सोबती, धर्मचारिणीने माझ्या आईवडिलांना कधीच कांही कमी पडू दिले नाही व सतत त्यांच्या सोबत राहून प्रेम दिले व मला प्रोत्साहन दिले त्या तिघांच्या ऋणातून मला कधीच मुक्त व्हायचे नाही. हे तिघे व माझी मुले माझे ऊर्जास्थान आहेत.
सारेच आश्चर्य गहिवरले. आनंदीतर सुखातिशयाने रडू लागली. अनुष्काने आनंदीला जवळ घेतले. व विनायकरावांना

(४)

आपले ओलसर डोळे पुसले. आनंदीने सुदेशची मनातच मीठमोहऱ्यांनी दृष्ट काढली. व समाधानाने दोघांना जवळ घेतले.

सायांनी बोलण्याचा आग्रह केल्यावर आनंदी-विनायकरावांनी स्मित मुद्रेने हात हातात घेत म्हणले......

सुदेश, अनुष्का व आमच्या दुधावरची साय -रिमा वैभव...
कृपा ठेव देवा आमच्या लेकरांवर...
आनंदाचे क्षणी ही पाय ठेव जमीनीवर...
तुझा वरदहस्त ईश्वरा असाच असू दे....
सुदेश-अनुष्काला दीर्घायुष्य लाभू दे.....

सायांचेच डोळे पाणावले. टाळ्यांच्या कडकडाटात कार्यक्रमाची सांगता झाली अन् आनंदी बंगला आनंदातिशयाने हसरा व उद्याची उमेद घेण्यासाठी वाट पाहू लागला.

सौ. शिल्पा गायकैवारी.
9850057437



